**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:22.04.2025** **वार:मंगळवार**

---

**ठळक बातम्या,**

1. देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी अविश्रांत काम करा - पंतप्रधानांचं नागरी सेवा कर्मचाऱ्यांना आवाहन
2. नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना 2023 साठीचा नागरी सेवा सर्वोत्कृष्टता पुरस्कार प्रदान
3. महिलांचा आत्मविश्वास वाढवण्याबरोबरच त्यांचं समाजातील स्थान बळकट करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं प्रतिपादन

आणि

4. पोप फ्रान्सिस यांचं व्हॅटिकन सिटी इथं निधन; भारतात तीन दिवसांचा दुखवटा

**नागरी सेवा दिन**

केंद्र सरकार आत्ता जी धोरणं आखत आहे त्यामुळे देशाचं पुढच्या हजार वर्षांचं भविष्य साकारलं जाईल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. 17 व्या नागरी सेवा दिनानिमित्त काल नवी दिल्लीत झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रत्येक क्षणी, प्रत्येक दिवशी अविश्रांत काम करा असं आवाहन त्यांनी नागरी सेवा कर्मचाऱ्यांना केलं. हे ध्येय साध्य करण्यासाठी एकत्रित प्रयत्न आणि निर्धार महत्त्वाचा आहे असं सांगून पंतप्रधान म्हणाले,

**सिविल सेवा को समकालीन चुनौतियों के अनुसार स्वयं को ढालना होगा, तभी वह प्रासंगिक बनी रह सकती है। हमें स्वयं के लिए नित्य नई कसौटियाँ बनाते रहना होगा और हर कसौटी को पार करते रहना होगा। अब हमें अपनी कसौटी बनानी है — 2047 के विकसित भारत के लक्ष्य से हम कितने दूर हैं, हम कहाँ तक पहुँचे हैं — इसका हिसाब लगाने का समय अब समाप्त हो चुका है। अब जहाँ हैं, वहीं से यह तय करना है कि वहाँ से हमें कहाँ जाना है। उस दूरी को तय करने के लिए मेरा रोडमैप क्या है? मेरी गति क्या है? और मैं दूसरों को साथ लेकर 2047 तक कैसे पहुँच कर सारे लक्ष्यों को प्राप्त कर सकूँ — यही हमारा सपना है, यही हमारा लक्ष्य है।**

या कार्यक्रमात पंतप्रधानांच्या हस्ते नागरी सेवा सर्वोत्कृष्टता पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना 2023 साठीचा नागरी सेवा सर्वोत्कृष्टता पुरस्कार प्रदान करण्यात आला. केंद्र सरकारच्या 12 प्रमुख योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि नाशिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासातील उल्लेखनीय योगदानासाठी ‘जिल्ह्यांचा समग्र विकास’ श्रेणीतला पुरस्कार शर्मा यांना मिळाला आहे. नाशिक जिल्ह्यात यशस्वीरित्या राबवलेल्या योजनांमागे नागरिकांचा सक्रीय सहभाग आणि प्रशासनाची अथक मेहनत आहे. या पुरस्कारामुळे आम्हाला भविष्यातील कामासाठी अधिक ऊर्जा आणि प्रोत्साहन मिळेल अशी प्रतिक्रिया शर्मा यांनी व्यक्त केली.

**मुख्यमंत्री**

प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लोकाभिमुख असणं महत्वाचं आहे, लोकांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करणं हे प्रशासनाचं कर्तव्य आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. नागरी सेवा दिवसानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. राज्यातली प्रशासकीय सेवा प्रगतीशील आहे. राज्यात झालेल्या परिवर्तनाचं श्रेय अधिकाऱ्यांनाच जातं असं मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान आणि स्पर्धेतल्या गुणवंत अधिकाऱ्यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

**अजित पवार पिंक ई रिक्षा**

मेट्रो स्थानकं, विमानतळ आणि पर्यटनस्थळांच्या ठिकाणी पिंक ई-रिक्षाला फीडर सेवेचा दर्जा देण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिली. पुण्यात आयोजित पिंक ई रिक्षा वितरण समारंभात ते काल बोलत होते. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि स्वावलंबी करणारी ही योजना आहे. त्यांचा आत्मविश्वास वाढवण्याबरोबरच त्यांचं समाजातील स्थान बळकट करण्याचा हा शासनाचा प्रयत्न आहे असं पवार यांनी सांगितलं. पहिल्या टप्प्यात राज्यात 10 हजार पिंक ई रिक्षा वितरणाचं महिला आणि बाल विकास विभागाचं उद्दीष्ट आहे अशी माहिती मंत्री अदिती तटकरे यांनी यावेळी दिली. तर याबाबतच्या प्रशिक्षण सत्रात प्रथमोपचार माहितीचा समावेश करावा, अशी सूचना विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी यावेळी केली.

**अजित पवार कृषी कार्यक्रम**

शेतीमध्ये उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर, लागवडीचा खर्च कमी करणं तसंच उत्पादनात वाढ करण्याच्या दृष्टीनं कृत्रिम बुद्धीमत्ता, ड्रोन आदी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक आहे. त्यादृष्टीने 'दिशा कृषी उन्नतीची-2029' हा उपक्रम कृषी क्षेत्राला दिशा देणारा ठरेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला. या पंचवार्षिक कार्यक्रमाचं उद्घाटन काल पुण्यात पवार यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. पुण्यात राबवण्यात येणारा ॲग्री हॅकॅथॉन उपक्रम टप्प्या- टप्प्याने राज्यभरात राबवण्यात येईल, असं पवार यांनी सांगितलं.दरम्यान कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठकही काल पुण्यात पार पडली. यावेळी बोलताना अजित पवार म्हणाले ----

**कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ऊस उत्पादन वाढ याबाबत आपल्याला सर्वांनाच थोडीफार माहिती आहेच. आता तुमच्या क्षेत्रामध्येही कृत्रिम बुद्धिमत्तेचा समावेश झालेला आहे. 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता — सध्या जगभरातील अनेक क्षेत्रांमध्ये तिचा वापर सुरू झालेला आहे. आपल्या राज्यात हा प्रकल्प राबवताना आम्ही सुमारे सहा पिकांची निवड केलेली आहे. त्यामध्ये ऊस, कापूस, सोयाबीन, भात, कांदा आणि मका ही सहा प्रमुख पिके घेतलेली आहेत**.

**माहिती आयुक्त**

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काल ज्येष्ठ पत्रकार राहुल पांडे यांना राज्याच्या प्रमुख माहिती आयुक्त पदाची शपथ दिली. यावेळी रवींद्र ठाकरे, प्रकाश इंदलकर आणि गजानन निमदेव यांना राज्यपालांनी माहिती आयुक्त पदाची शपथ दिली.

**वसुंधरा दिन**

आज जागतिक वसुंधरा दिन आहे. पर्यावरणाबाबतची जागरुकता वाढवण्यासाठी 1970 पासून दरवर्षी 22 एप्रिल रोजी वसुंधरा दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. राज्यात पर्यावरण, हवामान बदल विभागातर्फे आजपासून 1 मे म्हणजेच महाराष्ट्र दिनापर्यंत वसुंधरेची आराधना करण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत. यामध्ये राज्यातल्या प्रत्येक गावातले पाण्याचे विविध स्त्रोत तसंच नद्या, नाले, तलाव यांची स्वच्छता केली जाणार आहे. पर्यावरण रक्षणाच्या क्षेत्रात अनेक संस्था- संघटना कार्यरत आहेत, परकीय उपद्रवी जैविक आक्रमणाविरोधात काम करणारी माबी ही संघटना यापैकीच एक याचे  संस्थापक, पर्यावरण तज्ञ डॉक्टर सचिन पुणेकर या चळवळीबाबत बोलताना म्हणाले,

**पर्यावरण, आर्थिक आणि आरोग्य विषयक उपद्रवी जैविक घटकांच्या धोक्यांची जाणीव ठेवून, भारतामध्ये विविध घटकांची एक मोहीम उभारण्यात आली आहे. या मोहिमेमध्ये सेवाभावी संस्था, अभ्यासक आणि पर्यावरण प्रेमी व्यक्ती एकत्र येऊन काम करत आहेत. ही माबी मूव्हमेंट' (MABI Movement) आता देशभर पसरत आहे. या अभिनव पर्यावरण संवर्धन उपक्रमाचे लोकचळवळीत रूपांतर व्हावे, या हेतूने वेळोवेळी विविध कार्यशाळा, प्रदर्शनं आणि 'हरित पत्रका'च्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. याशिवाय 'तन होळी'सारख्या अनोख्या उपक्रमाच्या माध्यमातून परकीय जैविक आक्रमणाबाबत सातत्याने जागर केला जात आहे.**

**या उपक्रमासाठी आमचा नारा आहे :**

**हटवा तण , वाचवा वन!**

**हटवा तण, वाढवा वन!**

**हटवा तण आणि जपा कृषीधन व गोधन!**

**या मार्गदर्शक विचारांसह, आम्ही एक महत्त्वाचं आणि व्यापक अभियान हाती घेतलं आहे, जे पर्यावरण रक्षणासाठी अत्यंत आवश्यक ठरत आहे.**

**पंचायत पुरस्कार**

हवामान बदलाचे दुष्परिणाम रोखण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीसाठी 2023-24 या वर्षासाठी गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यातल्या डव्वा ग्राम पंचायतीला प्रथम क्रमांकाचा राष्ट्रीय पंचायत पुरस्कार मिळाला आहे

**पोप निधन - पंतप्रधान**

ख्रिश्चन कॅथॉलिक चर्चचे धर्मगुरू पोप फ्रान्सिस यांचं काल व्हॅटिकन सिटी इथल्या निवासस्थानी दीर्घ आजारानं निधन झालं. ते 88 वर्षांचे होते. पोप फ्रान्सिस यांच्या निधनाबद्दल जगभरातून शोक व्यक्त होत आहे. पोप फ्रान्सिस त्यांची करुणा, मानवता आणि आध्यात्मिक धैर्य यासाठी लाखो लोकांच्या ते सदैव स्मरणात राहतील असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. त्यांनी गरीब आणि वंचितांच्या सेवेसाठी आपलं आयुष्य वेचलं आणि त्यांच्या जीवनात आशेचे किरण निर्माण केले अशा शब्दांत पंतप्रधानांनी समाज माध्यमावरील संदेशाद्वारे श्रद्धांजली अर्पण केली आहे. पोप फ्रान्सिस यांच्या निधनाबद्दल भारत सरकारनं देशात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर केला आहे. आज आणि उद्या असे दोन दिवस आणि अंत्यसंस्काराच्या दिवशीही एक दिवसाचा दुखवटा पाळण्यात येणार आहे. या काळात सर्व सरकारी इमारतींवरील राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवण्यात येतील.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट मालिकेत काल शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली गुजरात टायटन्स संघानं कोलकाता नाईट रायडर्सचा 39 धावांनी पराभव केला. कोलकाताच्या ईडन गार्डन्स मैदानावर झालेल्या सामन्यात गुजरातनं दिलेल्या 199 धावांचं लक्ष्य पार करताना कोलकाताचा संघ 159 धावाच करू शकला.

**हवामान**

राज्यात कोकण, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान असेल. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. पुढचे दोन दिवस विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**